


Peer-Reviewed

(29)

Editor
Dr.Bapu G. Gholap

14) भारतातील प्राचीन वास्तूंचे संवर्धन एक आव्हान ||53
सहा. प्रा. डी.एन रिठे, जि. बीड

15) संवैधानिक संस्थांचा गैरवापर :एक राजकीय समस्या ||55
डॉ. अरुण पेंटावार, जिल्हा–बीड

16) समाज माध्यमे आणि युवक ||58
डॉ. आर. बी. काळे, जि. बीड

17) भारतातील पक्षपद्धती आणि राष्ट्रीय पक्ष ||60
श्री महेश अभिमन्यू मोहिते, जि. बीड

18) भ्रष्टाचार (Corruption) ||66
प्रा.डॉ.दिपक मोहनराव बुक्तरे, हनुमान अशोकराव रासवे, औरंगाबाद

19) युवकांमधील मद्यपानाची कारणे व परिणाम एक समाजशास्त्रीय अभ्यास ||71
महादेव सोपानराव घाटूळ, औरंगाबाद

20) भारतीय लोकशाही पुढील आव्हान : दहशतवाद ||75
डॉ. जाधव श्रीराम, माजलगाव

21) महाराष्ट्रातील आदिवासी विषयक माहिती : एक भौगोलिक अभ्यास ||77
शितकरधनंजय रमेश, डॉ.सोनवणे श्रीराम विक्रम,माजलगांव

22) मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या कारणे आणि उपाय ||79
डॉ. गणेश तुकाराम मोकासरे, डॉ. शामसुंदर आसाराम आगे, जि. बीड

23) भारतातील सामाजिक व राजकीय समस्या : आव्हाने व उपाय ||83
श्रीमती संजीवनी डावकर–तांगडे, डॉ. तिडके एन. आर

24) तरुणांमधील सोशल मीडियाची व्यसनाधीनता: एक सामाजिक समस्या ||86
डॉ. अंकुश एम. गोंडगे, कोल्हापूर

25) कृषी कायदे २०२० व शेतकरी आंदोलनाची चिकित्सा ||90
डॉ. ज्ञानराजा चिघळीकर, डॉ. महेश चौगुले, गडहिंग्लज

26) बेरोजगारी ||95
स्वाती आश्रुबा देवतर्शे

www.vidyawarta.com/03 http://www.printingarea.blogspot.com

25

# कृषी कायदे २०२० व शेतकरी आंदोलनाची चिकित्सा

डॉ. ज्ञानराजा चिघळीकर
(सहयोगी प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग)
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज

डॉ. महेश चौगुले
(सहाय्यक प्राध्यापक कॉमर्स विभाग)
शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज

***********

**प्रस्तावना**

भारत हा शेतीप्रधान देश आहे. देशातील ८५ टक्के शेतकरी हे ५ एकर पेक्षा कमी शेतजमीन असणारे आहेत. हंगामाच्या वेळी शेतमालाच्या किमतीत प्रचंड मोठी घट होत असते. यावर शेतकऱ्यांनी अनेकवेळा आंदोलनेही केलेली आहेत. केंद्र सरकारने कृषी कायदे २०२० संबंधित अध्यादेश आणला. १७ सप्टेंबर २०२० रोजी या अध्यादेशाला लोकसभेत मंजुरी दिली गेली. २० सप्टेंबर २०२० रोजी राज्यसभेत मंजुरी मिळाली.आणि दिनांक २४ सप्टेंबर२०२० रोजी भारताच्या राष्ट्रपतींनी स्वीकृती दिली. सदर कायद्यांना विरोध करण्यासाठी २४ सप्टेंबर २०२० रोजी पंजाब राज्यात तीन दिवसांचे रेल्वे रोको आंदोलन सुरु करण्यात आले. त्यानंतर किसान संघर्ष समन्वय समितीच्या आवाहनानुसार दिल्ली बॉर्डरवर दिनांक २६ नोव्हेंबर २०२० पासून देशभरातील २०० पेक्षा जास्त शेतकरी संघटनांनी कृषी कायद्यांच्या विरोधात आंदोलनाला सुरुवात केली.वर्षभरानंतर दिनांक १६ नोव्हेंबर २०२१ रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्यांसाठी केलेले तीन कृषी कायदे पाठीमागे घेत आहोत असे जाहीर केले. त्यानंतर शेतकरी आंदोलन व कृषी कायद्यावरील चर्चा पूर्णपणे बंद झाली. ही चर्चा पुन्हा सुरु झाली पाहिजे, आणि शेतमालाच्या किमतीचा प्रश्न निकाली काढला गेला पाहिजे.

**उद्देश**

कृषी कायदे –२०२० संक्षिप्त आढावा घेणे.

शेतकरी आंदोलनाची पार्श्वभूमी समजून घेवून, आंदोलनाची चिकित्सा करणे.

**गृहीतक**

कृषी कायदे –२०२० हे सदोष आहेत.

कृषी कायदे हे व्यापारी व भांडवलशाही अर्थव्यवस्थेला पोषक ठरणारे आहेत.

केंद्र सरकारकडून शेतकरी आंदोलन योग्य पद्धतीने हाताळले गेले नाही.

**संशोधन पद्धती**

सदर शोधनिबंध हा माहितीच्या दुय्यम साधनसामग्री वर आधारित असून, याकरीता केंद्र सरकारद्वारा प्रकाशित करण्यात आलेले साहित्य, नियतकालिके आणि वर्तमानपत्रात प्रकाशित झालेल्या लेखांचा व माहितीचा आधार घेलेला गेला आहे. तसेच विश्लेषण पद्धतीचा अवलंब करून कृषी कायदे व शेतकरी आंदोलनाची चिकित्सा करण्यात आली आहे.

**संशोधन महत्व**

भारत हा शेती प्रधान देश आहे. शेतमालाच्या किमतीचा प्रश्न हा शेतकऱ्यांसमोरील सर्वात महत्वाचा प्रश्न आहे. देशातील कोणत्याही प्रश्नापेक्ष शेती आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी प्राधान्याने लक्ष देण्याची गरज आहे. शेतकरी आंदोलनाच्या रूपाने ७५० पेक्षा अधिक शेतकऱ्यांना आपला जीव गमवावा लागला आहे.

**कृषीकायदे–२०२०**

शेतकरी (सक्षमीकरण आणि संरक्षण) किंमती विषयक आश्वासन आणि कृषी सेवा करार कायदा २०२० यालाच करार शेती कायदा असेही म्हणता येईल. या कायद्यानुसार शेती करारास मान्यता मिळणार आहे. शेतकऱ्याला आपला शेतमाल विकण्याचा प्रायोजकांशीध कंपनीशी करार करता येईल. कोणता भाव मिळेल हे सुद्धा अगोदरच ठरवता येईल.परंतु शेतकऱ्यांना सर्वप्रकारची आदाने/सेवा प्रायोजक/ कंपनी कडूनच घ्याव्या लागतील. त्यामुळे शेती अदानांच्या जास्त किंमती आकारण्याचा धोका पत्करावा लागेल शेतकरी आणि प्रायोजक/ कंपनी यांच्यात वाद निर्माण

झाला तर सर्वप्रथम शेती करारच्या तरतुदीनुसार स्थापन झालेल्या समेट मंडळाकडे जावे लागेल. समेट मंडळात वाद मिटला नाही तर शेती करारांतर्गत वाद सोडविण्यासाठी उपविभागीय प्राधिकरण म्हणून घोषित केलेल्या उपविभागीय दंडाधीकाऱ्याकडे जाता येईल. शेवटच्या आणि तिसऱ्या अपिलासाठी कलेक्टर कडे जाता येईल. परंतु कोणत्याही परिस्थितीत न्यायालयात (सिविल कोर्टात) जाण्याचा पर्याय असणार नाही.

**कृषी उत्पादन व्यापार आणि वाणिज्य (प्रोत्साहन आणि सुविधा) कायदा—२०२०**

कृषी मालाची खरेदी विक्री करण्यासाठी १९६० नंतरच्या काळात कृषी उत्पन्न बाजार समित्यांची स्थापना करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र राज्याचा विचार करता सध्या ३०५ समित्या अस्तित्वात आहेत. पैकी निम्या तोट्यत आहेत. नवीन कायद्यानुसार शेतकऱ्यांना शेतमाल विक्रीचे स्वातंर्त्य देण्यात आलेले आहे. शेतकरी आपला शेतमाल बाजार समित्या बाहेर, आंतरराज्य आणि ऑनलाईन पद्धतीने सुद्धा विकू शकतात. परंतु भारतीय संविधानाच्या अनुसूची त्त नुसार कृषी विपणन हा राज्याचा विषय असून केंद्रसरकार हा कायदा एकतर्फी लागू करत आहे असा आरोप शेतकरी संघटनांनी केला आहे. नवीन बदलामुळे आधारभूत किंमतीचा प्रश्न निर्माण झालेला आहे. त्यामुळे शेतकरी संघटनांना वाटते की बाजार समीती बाहेर शेतमाल विकला तर किमान आधारभूत किमत मिळणार नाही.

**जीवनावश्यक वस्तू (सुधारणा) कायदा—२०२०**

जीवनावश्यक वस्तू सुधारणा कायदा सर्वप्रथम १९५५ मध्ये लागू करण्यात आला. मूळ कायद्यामध्ये सुधारणा करून पूर्वी समाविष्ट असलेल्या वस्तूंपैकी तृणधान्ये, कडधान्ये, बटाटे, कांदे, खाद्यातेलबिया आणि खाद्यतेल आदी जीवनावश्यक वस्तूंना वगळण्यात आलेले आहे.यामध्ये युद्ध , दुष्काळ, नैसर्गिक आपत्ती अशी असाधारण परीस्थिती उद्‌भवल्याशिवाय सरकार हस्तक्षेप करणार नाही. याचा परिणाम असा होईल की, व्यापारी हंगामात या वस्तूंचे भाव पाडतील आणि त्यांच्याकडे असेल तेवढ्य पैशाचा व जागेचा वापर करून या वस्तूंचा साठा करतील. तोच माल कांही काळाने जास्त दराने विकून नफेखोरी करतील.

**शेतकरी आंदोलनाची पार्श्वभूमी**

देशभरातील शेतकऱ्यांच्या शेकडो आंदोलनाचा परिणाम हमी भावाची अर्थात आधारभूत किमतीची संकल्पना पुढे आली. १९६५ मध्ये शेतमाल किंमत आयोग आणि नियंत्रित बाजारपेठा स्थापन करण्यात आल्या.नोव्हेंबर २००४ मध्ये डॉ. एम. एस. स्वामिनाथन समितीची स्थापना करण्यात आली. समितीने ऑक्टोबर २००६ मध्ये आपला अहवाल सादर केला.

शिफारशीनुसार शेतीमालाला उत्पादनखर्च व ५० टक्के नफा अशा स्वरुपात किंमती देणे क्रमप्राप्त होते परंतु तसे झाले नाही. त्यातच नैसर्गिक अपतींची भर पडत गेली.

२०१६ मधील अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई व कर्जमाफी मिळावी आदी मागण्यासाठी जानेवारी २०१७ मध्ये तामिळनाडू मधील शेतकऱ्यांनी दिल्लीमध्ये आंदोलन सुरु केले. २२ एप्रिल २०१७ रोजी त्यांनी स्वमुत्र प्राशन करून सरकारचा निषेध केला परंतु सरकारने त्याकडे लक्ष दिले नाही. संपूर्ण देश कोरोणा महामारीचा सामना करत असताना केंद्र सरकारने तीन कृषी विधेयके अध्यादेश स्वरुपात आणली. लोकसभेत चर्चा घडवून न आणताच बहुमताच्या जोरावर मंजूर करून घेतली. राज्यसभेत प्रचंड गदारोळात आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आली. राष्ट्रपतींच्या मंजुरीनंतर त्यांचे कायद्यात रुपांतर झाले.२ ऑक्टोबर पासून पंजाबमधील शेतकऱ्यांनी रेल्वे रुळावर धरणे सत्याग्रह केला. रेल्वे वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली तरीही केंद्र सरकारने लक्ष दिले नाही. अकाली दलाच्या हरसिम्रन बादल यांनी आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला, तर अकाली दलाने रालोआ मधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला परंतु केंद्रसरकारने त्याकडेही दुर्लक्ष केले.

परिणामी देशभरातील २०० पेक्षा जास्त शेतकरी संघटनांनी एकत्र येवून "अखिल भारतीय किसान संघर्ष समन्वय समिती" स्थापन केली. २६ नोवेंबर २०२० संविधान दिनाचे औचित्य साधून दिल्लीच्या हरियाणा आणि उत्तर प्रदेश सीमेवर सिंधू, टीकरी, गाझीपुर बोर्डरवर तसेच पलवल राष्ट्रीय महामार्ग क्रमाक ८ येथे आंदोलन सुरु केले. आंदोलनात पंजाब हरियाणा आणि पश्चिम उत्तर प्रदेश मधील शेतकरी मोठ्या प्रमाणात सहभागी

झाले असले तरी, आंदोलनाची व्याप्ती मात्र देशभर पसरली.

**आंदोलन दाबण्याचा प्रयत्न**

संविधानिक अधिकाराचा वापर करून देशभरातील शेतकरी अहिंशेच्या मार्गाने आंदोलन करीत असताना सरकारने त्यांच्यासोबत योग्य पद्धतीने चर्चा करणे आवश्यक होते.परंतु तसे न करता आंदोलक शेतकऱ्यांना दिल्लीत येण्यापासून रोखण्याकरिता अत्यंत अमानवी व निर्दयी पद्धतीने अश्रुधुरांचे गोळे फोडण्यात आले. कडाक्याच्या थंडीचे दिवस असतानाही थंड पाण्याचे लोट सोडण्यात आले. राष्ट्रीय महामार्गावर जेसीबीने खड्डे खोदने, महामार्गावर लोखंडी खिळे ठोकणे, तारेचे कुंपण घालणे असे अनेक प्रकार अवलंबण्यात आले.

**आंदोलची बदनामी**

२६ जानेवारी २०२१ रोजी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून शेतकऱ्यांच्या वतीने ट्रकटर रॅली काढण्यात आली. त्यामध्ये हिसाचाराच्या घटना घडल्या. 'भाजपशी संबंधीत दीप शिद्धू यांनी लाल किल्यावर तिरंगा काढून आपला ध्वज फडकवला ...आंदोलक शेतकऱ्यांनी तिरंगा ध्वज काढून आपला ध्वज फडकवला ही बातमी चुकीची आहे.' (नवाब मलिक दैनिक लोकमत दिनांक २७ जानेवारी २०२१) 'लाल किल्ल्यावरील राष्ट्रध्वज काढला नाही. कृषी कायद्यांना प्रतिकात्मक विरोध म्हणून 'निशान साहेब' आणि शेतकरी संघटनेचा झेंडा तेथे लावण्यात आला. यावेळी किसान मजदूर ऐकताची घोषणाही दिली गेली. हा प्रकार कोणत्या योजनेचा भाग नाही, यास जातीय रंग देवू नये.' (दीप सिद्धू अग्रोवान दिनांक २८ जानेवारी २०२१)

'शेतकरी आंदोलनाच्या सुरुवातीपासून दीप सिद्धूचे वर्तन लक्षात घेवून त्यांना बाजूला करण्यात आले होते.' (योगेंद्र यादव अग्रोवान दिनांक २८ जानेवारी २०२१) 'दिल्लीतील उद्याच्या शेतकरी संचलनामध्ये आंदोलन बदनाम करण्यासाठी घातपाताची शक्यता नाकारता येत नाही.' (शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी टीव्ही ९ ला दिलेली मुलाखत दिनांक २५ जानेवारी २०२१) 'दोन वर्षापूर्वीचे व्हीडीवो क्लीप समाजमाध्यामातून फिरवून या आंदोलनात खलिस्तान विषयी घोषणा दिल्या गेल्याचे आणि या आंदोलनातील लंगर सेवा चीन व पाकिस्तानातून आलेल्या धनशक्तीवर चालली असल्याचे तथ्यहीन आरोप हीच भाजपाची हत्यारे आहेत.' (मेधा पाटकर दैनिक लोकसत्ता दिनांक २० डिसेंबर २०२०) या बरोबरच शेतकरी आंदोलकांवर खालीस्थानवादी, देशविरोधक सुपारी घेतल्याचेही आरोप करण्यात आले होते.

**शेतकरी आंदोलन व न्यायालय**

दिनांक १२ जानेवारी २०२१ रोजी सर्वोच्च न्यायालयचे न्यायाधीश शरद बोबडे, न्यायाधीश व्ही राम सुब्रमनियम आणि न्यायधीश ए. एस. बोपन्ना यांनी तीन कृषी कायद्यांना तात्पुरती स्थगिती दिली. तोडगा काढण्यासाठी चार सदसीय समिती नेमली गेली. यापैक भूपिंदर सिंग मान यांनी मी शेतकऱ्यांच्या हिताविरोधी काम करू शकत नाही अशी भूमिका घेत समितीमध्ये काम करण्यास नकार दिला. तर अनिल घनवट, अशोक गुलाटी आणि प्रमोदकुमार जोशी यांनी यापूर्वीच कृषी कायद्यांचे समर्थन केलेले आहे त्यामुळे शेतकऱ्यांनी ही समितीच आम्हाला मान्य नाही अशी भूमिका घेतली.

केंद्र सरकारच्या शेतकरी आंदोलन हाताळन्याच्या पद्धतीवर सर्वोच्च न्यालयाने आपले मत नोंदवताना म्हंटले कि, कायदे करताना चर्चा झालेली नाही. शासनाने स्थगिती द्यावी अन्यतः न्यायालय देईल. किमान आधारभूत किंमत व्यवस्था सुरु ठेवण्यात यावी. तसेच कंत्राटी शेतीसाठी शेतजमिनीची विक्री होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**शेतकरी आंदोलन व प्रसार माध्यमे**

शेतकरी आंदोलकांच्या मते, प्रस्थापित इलेक्ट्रॉनिक आणि प्रिंट मिडीयाने (अपवाद वगळता) आंदोलनाची योग्य दखल घेतली नाही. संधी मिळेल तेंव्हा सत्य मांडण्याऐवजी आंदोलनाची बदनामी केली. आंदोलक शेतकऱ्यांनी आंदोलनाची इत्यंभूत माहिति पोहेचवण्यासाठी 'ट्रॉली टाईम्स'हे हिंदी आणि पंजाबी भाषेत प्रकाशित होणारे स्वत:चे वर्तमानपत्र सुरु केले. विशेष म्हणजे त्यावर 'इन्किलाब दि तलवार विचारां दि सान ते तेज हिंदी ए'अर्थात क्रांतीची तलवार विचारांच्या रसायनाने चमकते. हे भगतसिंग यांचे वाक्य

छापले गेले.

**शेतकरी आंदोलन आणि शेतकऱ्यांचे मृत्यू**

लखीमपुर खीरीतील तीकोनिया मध्ये सकाळी ८ वाजता शेतकऱ्यांचे आंदोलन सुरु झाले. आंदोलनकारी शेतकऱ्यांनी केंद्रीय गृहराज्यमंत्री अजय मिश्र आणि उपमुख्यमंत्री केशव मौर्य यांचे हेलिकॉप्टर उतरणाऱ्या ठिकाणी ठाण मांडले. यानंतर दुपारी २.४५ वाजता उपमुख्यमंत्री यांचा ताफा तीकोनिया भागातून जात असताना शेतकऱ्यांनी काळे झेंडे दाखवून निषेध केला. शेतकऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार उपमुख्यमंत्री यांच्या तापयातील आशिष मिश्राने शेतकऱ्यांवर गाडी चालवली यामध्ये ३ शेतकऱ्यांचा मृत्यू झाला तर हिंसाचारात ८ शेतकरी जखमी झाले. (my महानगर.com दिनांक ४ ऑक्टोबर २०२१)

शेतकरी आंदोलनात आता सुमारे ७५० शेतकऱ्यांचा दुर्दैवाने मृत्यू झाला आहे मात्र भारत सरकारकडून त्यांच्या मृत्यूवर कोणत्याही प्रकारे शोक व्यक्त करण्यात आलेला नाही.' (राकेश टीकैत दैनिक दिव्य मराठी दिनांक ८ नोव्हेंबर २०२१)संसदेच्या हिवाळी अधिवेशनात ऐका प्रश्नाला लेखी उत्तर देताना केंद्रीय कृषी मंत्री नरेंद्र सिंह तोमर यांनी म्हंटले आहे कि, 'शेतकरी आंदोलनात मृत्युमुखी पडलेल्या शेतकऱ्यांची आणि त्यांच्यावर दाखल झालेल्या गुन्ह्यांची माहिती आपल्याकडे नाही, त्यामुळे आर्थिक मदत म्हणजेच नुकसानभरपाई देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.' (दैनिक सकाळ दिनांक १ डिसेंबर २०२१)

**निवडणुका आणि माघार**

केंद्र सरकारला शेतकऱ्यांच्या हितापेक्षा उत्तर प्रदेश, उत्तराखंड, पंजाब, गोवा आणि मणिपूर या पाच राज्यातील निवडणुका महत्वाच्या वाटल्या. प्रधानमंत्री यांना गुरुनानक जयंतीचा दिवस निवडावा लागला. कृषी विधेयेके देश हिताची होती. मात्र, त्याला विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांना ती समजून सांगण्यात कमी पडल्याची भावनिक साद घालून, कृषी कायदे २०२० मागे घेत आहोत अशी घोषणा करावी लागली.शेतकरी आंदोलनाचा विपरीत परिणाम होईल असे वाटत होते परंतु तसे कांही घडले नाही.

**शेतकरी आंदोलनाची जागतिक दखल**

भारतातील शेतकरी आंदोलनाची जगातील महत्वाच्या मध्यम समूहांनी दखल घेतली. आंदोलकांची धरपकड, इंटरनेट सेवा खंडित करणे यासह अन्य दडपशाही मार्गाचा अवलंब केल्यामुळे केंद्र सरकारवर विदेशी माध्यमांनी कडक शब्दात टीका केली. सीएनएन, बीबीसी, द न्यूयॉर्क टाईम्स, द इंडिपेंडंट, ब्लूमबर्ग, द वॉल स्ट्रीट जर्नल, द गार्डियन, अल जझीरा आदी माध्यमांनी केंद्र सरकारला धारेवर धरले.

पॉपस्टार रिहानाने आपण भारतीय शेतकऱ्यांसोबत आहोत, या आशयाचे ट्वीट केल्यानंतर जगभरातील अनेक सेलिब्रिटी व राजकीय व्यक्तींचे लक्ष या आंदोलनाने वेधले. वातावरणातील बदलाचा अभ्यास करणारी ग्रेटा थनबर्ग, मीना हॅरीस यांच्यासह अनेक मान्यवरांनी शेतकरी आंदोलनाला पाठींबा दिला. ऐवढेच नाही तर अमेरिका, ब्रिटन, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आदी ठिकाणी शेतकऱ्यांना पाठींबा देणाऱ्या रॅल्या निघाल्या. (शेतीप्रगती, डिसेंबर २०२१ पृष्ठ क्रमांक १६)

**निष्कर्ष**

शेतकरी (सक्षमीकरण आणि संरक्षण) किंमती विषयक आश्वासन आणि कृषी सेवा करार कायदा २०२० नुसार शेतकऱ्यांना आपला शेतमाल विकण्याचा करार करण्याचे स्वातंत्र्य मिळणार असले तरी, शेतकऱ्यांची फसवणूक होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वाद निर्माण झाल्यास कोर्टात जावून दाद मागण्याचा पर्याय उपलब्ध नाही. कृषी उत्पादन व्यापार आणि वाणिज्य (प्रोत्साहन आणि सुविधा) कायदा– २०२० नुसार शेतकऱ्यांना आपला शेतमाल विकण्याचे स्वातंत्र्य मिळणार असले तरी, हमी भावाची शाश्वती मिळत नाही.

जीवनावश्यक वस्तू (सुधारणा) कायदा–२०२० नुसार तृणधान्ये, कडधान्ये, बटाटे, कांदे, खाद्यातेलबिया आणि खाद्यतेल आदी जीवनावश्यक वस्तूंना वगळण्यात आलेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांपेक्षा व्यापाऱ्यांनाच फायदा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर कायद्यातील तरतुदी बघता हे कायदे व्यापारी आणि भांडवलशाही अर्थव्यस्थेला पूरक असल्याचे दिसून येतात.

भारत हा शेतीप्रधान देश असून शेतमालाच्या किमतीचा प्रश्न हा शेतीसमोरील सर्वात महत्वाचा प्रश्न असून सरकार त्याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे स्पष्ट होत आहे. शेती विषयक कायदे करताना संसदेत त्यावर सविस्तर चर्चा झालेली नाही. शेतकऱ्यांना विश्वासात घेतले गेले नाही.

केंद्र सरकारला आंदोलन योग्यपद्धतीने हाताळता आले नाही. शेतकरी संघटनांशी योग्य संवाद साधण्याऐवजी आंदोलन दाबण्याचा, बदनामी करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

देशातील प्रसार माध्यमांनी आंदोलनचे योग्य

रिपोर्टिंग केले नाही (कांही अपवाद वगळता) म्हणून शेतकऱ्यांना स्वतःचे 'ट्रॉली टाईम्स' हे वर्तमानपत्र सुरु करावे लागले, सोशल मिडीयाचा वापर मोठ्यप्रमाणात करावा लागला. परिणामी माध्यमांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाला.परंतु जगभरातील प्रसार माध्यमांनी व सेलीब्रिटींनी आंदोलनाला पाठींबा दिला.

शेतकरी आंदोलनात ७५० पेक्षा जास्त शेतकऱ्यांचा मृत्यू झालेला असताना सुद्ध सरकारकडे त्याची अधिकृत आकडेवारी उपलब्ध होत नाही. मृत्यू झालेल्या शेतकरी कुटुंबाना नुकसानभरपाई दिली गेली नाही.कांहीही असले तरी २६ जानेवारी २०२१ रोजी लाल किल्ल्यावर झालेल्या घटनेचे समर्थन शेतकरी संघटनांना करता येणार नाही.

**शिफारशी :**

कृषी कायदे २०२० मागे घेणे हे शेतकऱ्यांच्या समोरील प्रश्नाचे उत्तर असू शकत नाही. शेतीमालाला हमी भाव मिळावा या मुख्य मागणीकडे जास्त काळ दुर्लक्ष करून चालणार नाही. हमी भावाची शास्वती देणारा कायदा केल्याशिवाय शेतकऱ्यांचे प्रश्न सुटणार नाहीत. म्हणून शेतकरी संघटनांनी आपल्या हमी भावाच्या मागणीवर ठाम राहिले पाहिजे.

सरकारने लवकरात लवकर शेतकऱ्यांना विश्वासात घेवून कृषी कायदे २०२० चा अभ्यास करण्यासाठी समिती गठीत करावी. योग्य त्या दुरुस्त्या करून संसदेत कायद्यांची चर्चा घडवून आणावी.

शेतकरी आंदोलनात मृत झालेल्या शेतकऱ्यांची माहिती गोळा करण्यासाठी शेतकऱ्यांना विश्वासात घेवून समिती गठीत करावी. मृत्यू झालेल्या शेतकरी कुटुंबाना योग्य ती नुकसानभरपाई देण्यात यावी.

**सारांश :**

शेतकरी आंदोलनातून योग्य धडा घेवून केंद्रसरकारने या पुढील काळात शेतकरी आंदोलनाची योग्य दखल घेतली पाहिजे. सुसंवाद साधला पाहिजे. कायदे करताना संसदेत योग्य चर्चा घडवून आणली पाहिजे. शेतकऱ्यांची शेतजमीन हिरावून घेतली जाणार नाही याची शाश्वती दिली पाहिजे. कारण शेतकरी जगाला तरच देश जगणार आहे. यासंदर्भातील संत तुळशीदास यांचा संदेश अत्यंत महत्वाचा आहे.

खेती न किसान को भिखारी को न भीक बली,बनिक को बनिज न चाकर को चाकरी,
जीविका विहीन लोग सीद्यमान सोच—बस,कहै एक एकन सों, कहाँ जाई का करी ? —संत तुलसीदास

शेतकऱ्यांची शेती जर हिरावून घेतली तर संपूर्ण व्यवस्थाच कोलमडूनपडेल. भिकारी अन्न विरहित राहतील. व्यापाऱ्यांचे व्यवसायबुडतील. नोकऱ्या मिळणे बंद होईल. किंबहुना प्राप्त नोकऱ्याहीजातील. उपजीविकाविहीन लोक एकमेकांना विचारतील कि, आताकुठे जायचे ? काय करायचे ?

**संदर्भ**

महिला विधी भारती, जनवरी दृमार्च २०२१ अंक :१०६ पेज २५ ते ३५

महिला विधी भारती, अक्तूबरदृदिसंबर २०२० अंक :१०५ पेज ३०७ ते ३१०

परिवर्तनाचा वाटसरू, १ ते १५ फेब्रुवारी २०२१ वर्ष २० वे अंक १६ वा पेज १४ ते २२

परिवर्तनाचा वाटसरू, १६ ते ३० जून २०२१ वर्ष २१ वे अंक ४ ठ पेज ६ ते २२

परिवर्तनाचा वाटसरू, १ ते १५ एप्रिल २०२१ वर्ष २० वे अंक २३ वा पेज २६ ते ४१

प्रबोधन प्रकाशन ज्योती, ऑक्टोबर २०२० वर्ष ३१ अंक ३६५पेज २१ ते २८

प्रबोधन प्रकाशन ज्योती, जानेवारी २०२१ वर्ष ३२ अंक ३६८ पेज ५१ ते ५६

प्रबोधन प्रकाशन ज्योती, फेब्रुवारी २०२१ वर्ष ३२ अंक ३६६ पेज ४४ ते ४६

प्रबोधन प्रकाशन ज्योती, ऑक्टोबर २०२१ वर्ष ३२ अंक ४०७ पेज १३ ते १८

प्रबोधन प्रकाशन ज्योती, डिसेंबर २०२१ वर्ष ३२ अंक ४०६ पेज ३७ ते ४४

भारताचे राजपत्र, सी.जी.डी.एल. अ—५०६२०२० —२१६७४५ असाधारण भाग—दोन खंड—१ प्राधिकरणाद्वारे प्रकाशित संख्या—४५ नवी दिल्ली, रविवार दिनांक २७ सप्टेंबर २०२०/ अश्विन १५, १९४२ शके

भारताचे राजपत्र, सी.जी. डी. एल. अ—५०६२०२०—२१६७४५ असाधारण भाग—दोन खंड—१ प्राधिकरणाद्वारे प्रकाशित संख्या—१५१ नवी दिल्ली, रविवार दिनांक २७ सप्टेंबर २०२०/ अश्विन १५, १९४२ शके

भारत सरकार विधी, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय, अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ (१९५५ चा अधिनियम क्रमांक १०) १७ फेब्रुवारी १९६५ रोजी यथाविद्यमान, महाराष्ट्र विशोधानासहित